**<u>उलटतपास वादीतर्फे श्री. डी.ए.साबने वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१९.** आता मला नि.क्रं.६३ ही मतदारयादी दाखविली. त्यामध्ये अनुक्रं.७२६ येथील मतदारक्रमांक एन.जे.एफ ११५८३६४ यावरील फोटो माझा आहे हे खरे नाही. माझे नाव जनाबाई आहे हे खरे आहे. माझे नाव अनुसयाबाई हे कागदोपत्री नाव नाही हे खरे आहे. मी मतदान केलेले आहे. मी चित्रलेखा या नावाने मतदान करत होते. नि.क्रं.६३ या मतदारयादीप्रमाणेच मी आतापर्यंत मतदान केले हे खरे नाही. मॅक्स हॉस्पीटलमधील पावत्यावरील सही माझी सही नाही. आता मला नि.क्रं.८३ दाखविला. त्यावरील सही माझी नाही. जनाबाई मोहनराव जगताप, व मोहनराव जयंतराव जगताप असे नि.क्रं.८३ वर जे उल्लेखीत केलेले आहे ते ज्याने ते लिहीले आहे त्याला ते माहिती आहे, मला माहिती नाही. मोहनराव यांनी नि.क्रं.८३ वरील मजकूर लिहीला व सही केली व त्यानंतर मी त्यावर सही केली हे खरे नाही. माझ्या सरतपासातील मजकूर कोठे टाईप केला, कोणी टाईप केला हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मला निव्वळ अंगठा करायला सांगितला म्हणून अंगठा केला. सरतपासातील मजकूर सगळा खोटा आहे हे खरे नाही.

**२०.** माझा मुलगा बाजीराव याचे लग्न कधी झाले हे मला माहिती नाही. बाजीरावच्या पत्नीचे नाव लताबाई हे आहे. ती उमरगा रेतु येथील आहे. रेतु उमरगा येथे माझे कोणीही नातलग नाहीत. मोरेवाडी ते चोबळी हे अंतर चालत १५-२० मिनीटाचे आहेत. चोबळी गावात पूर्वी ब्राम्हण कुटुंब होते. त्या काळी दहा गावात एक ब्राम्हण असे. दत्ता पंढरी सुर्यवंशी यांना मी ओळखत नाही. हे खरे की, दत्ता सुर्यवंशी यांचे गाव रेतू उमरगा हे होते. माझ्या लग्नाची पत्रीका नाही. माझ्या लग्नाचे फोटो नाहीत. मला माझ्या लग्नातील चौथी मंगलअष्टका पाठ नाही.हे खरे नाही की, माझे लग्नच झालेले नाही. माझ्या तथाकथीत लग्नात सप्तपदी झालेली नाही हे खरे नाही. हे खरे नाही की, पतीच्या पेन्शचा अधिकार माझा नाही. हे खरे नाही की, खोटे कागदपत्रे सादर करुन पेन्शन मिळविली. हे खरे नाही

की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
दिनांक १८/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर